ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 04 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मोदींविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या युवतीविरोधात अद्याप गुन्हा नाही




पान 3 वरुन...

पिंपरीतील घटना; पती, पत्नी आणि मुलीचा मृत्यू

## बिहारमधील बांकीपूर पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांचा दणदणीत विजय

# भाजपचा बालेकिल्ला उद्ध्वस्त!



**महाईन्यूज । बिहार**

**संपूर्ण देशातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून असलेल्या बांकीपुर विधानसभा मतदातसंघातील पोटनिवडणुकीत जनसुराज्य पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी भाजपाला दणका देत सनसनाटी विजय मिळवला आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या नितीन नवीन यांच्या परंपरागत मतदारसंघात मतमोजणीच्या सुरुवातीपासून आघाडी घेणाऱ्या प्रशांत किशोर यांनी अखेरीस भाजपाचे उमेदवार निरज कुमार यांच्यावर १९ हजारांहून अधिक मतांचं मताधिक्य घेत विजय मिळवला आहे.**

बिहारमधील बांकीपूर पोटनिवडणुकीत भाजपचा दारूण पराभव झालाय. जन सूरज पार्टीचे (जेएसपी) संस्थापक प्रशांत किशोर यांनी भारतीय जनता पक्षच्या बाल्लेकिल्ल्यात सुरूंग लावत मोठा विजय मिळवलाय.

प्रशांत किशोर यांनी भारतीय जनता पक्षाचे (भाजप) उमेदवार नीरज कुमार यांचा १८,९५३ मतांच्या फरकाने पराभव केलाय. प्रशांत किशोर यांना ६३,२०३ मते मिळाली, तर नीरज कुमार यांनी ४४,२५० मते मिळवली. दरम्यान, राष्ट्रीय जनता दलाच्या (आरजेडी) उमेदवार रेखा कुमारी १४,०८५ मतांसह तिसऱ्या स्थानावर राहिल्या.

दरम्यान बांकीपूर हा भाजपचे अध्यक्ष नितीन नवीन यांचा पारंपरिक मतदारसंघ मानला जातो. नवीन हे येथून सलग पाचवेळा आमदार म्हणून निवडून आलेत. ते राज्यसभेवर गेल्यानंतर या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली होती. मात्र याठिकाणी जन सूरज पार्टीचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी दणदणीत विजय मिळवलाय.

### बिहारचा मुख्यमंत्री बदला

मत मोजणीदरम्यान प्रशांत किशोर यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, "मी आमदार झालो म्हणजे बांकीपूरचे रूपांतर रातोरात बेंगळुरूमध्ये होणार नाही, पण पुढील दोन-तीन महिन्यांत तुम्हाला येथे नक्कीच काही सुधारणा दिसून येतील. बांकीपूरच्या जनतेने भाजप नेतृत्वाला एक स्पष्ट संदेश दिला आहे. कृपया बिहारच्या मुख्यमंत्रीपदी एखाद्या चांगल्या व्यक्तीची नियुक्ती करा."

### कोण आहेत प्रशांत किशोर?

मूळ बिहार येथील रहिवासी असलेले प्रशांत कुमार एक प्रसिद्ध रणनितीकार आहेत. त्यांनी आधी विविध पक्षांसाठी राजकीय रणनितीकार म्हणून काम केलंय. २०१५ मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीत राजद-जद (यू)- काँग्रेसच्या महाआघाडीच्या विजयात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यानंतर २०१७ मध्ये पंजाब विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, २०१९ मधील आंध्र विधानसभा निवडणुकीत वायएसआर काँग्रेस पक्ष, २०२०मधील दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी, २०२१ मध्ये पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेस आणि तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत द्रमुकसाठी त्यांनी रणनितीकार म्हणून काम केले होते. दरम्यान, आज झालेल्या मतमोजणीच्या सुरुवातीच्या फेऱ्यांपासूनच प्रशांत किशोर यांनी आघाडी मिळवली.

# नऱ्हे दरोडा प्रकरणात पोलिसांना झटका!

## एक कोटींच्या लूट प्रकरणात न्यायालयाचा मोठा निर्णय; पोलिसांच्या भूमिकेची चौकशी

महाईन्यूज । पुणे

**सिंहगड रस्त्यावरील नवले पुलाजवळ एक कोटी रुपयांची रोकड लुटण्याचा कट, व्यावसायिकाच्या डोळ्यांत मिरची पूड फेकून स्वतःला पोलिस असल्याची बतावणी आणि त्यानंतर उघडकीस आलेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या कथित सहभागामुळे गाजत असलेल्या नऱ्हे दरोडा व खंडणी प्रकरणात पुणे सत्र न्यायालयाने मोठा झटका दिला आहे.**




### न्यायालयाचे स्पष्ट निरीक्षण

न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरला नाही. आदेशात न्यायालयाने नमूद केले की, या प्रकरणातील आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. इतर आरोपींच्या चौकशीत अर्जदारांची नावे समोर आली असून, त्यांनी मुख्य आरोपींना संरक्षण दिल्याचा आणि त्यांच्याबरोबर समान उद्देशाने काम केल्याचा प्रथमदर्शनी निष्कर्ष दिसून येतो. त्यामुळे अंतरिम अटकपूर्व जामीन देण्यास कोणताही वाव नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने या सर्व बाबींचा विचार करून अंतरिम अटकपूर्व जामीन नाकारला असून, सरकारी पक्षाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

या प्रकरणात आरोपी असलेल्या पोलिस हवालदार प्रमिला शरद निकम आणि पोलिस अजीजजब्बार इसुब मेस्त्री यांनी दाखल केलेला अंतरिम अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश पुरुषोत्तम चौधरी यांनी फेटाळून लावला.

याप्रकरणी सरकारी पक्षाला याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. प्रथमदर्शनी आरोपींचा इतर संशयितांबरोबर समान उद्देश दिसून येत असल्याचे नमूद करीत न्यायालयाने कोणताही दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या आदेशामुळे संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, पोलिस दलातही मोठी खळबळ उडाली आहे. तपास यंत्रणेला आता या दोघांच्या भूमिकेचा अधिक सखोल तपास करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

तळेगाव दाभाडे येथील व्यावसायिक हर्षवर्धन भूषण पवार हे १८ जुलै २०२६ रोजी आपल्या कर्मचाऱ्यासह एक कोटी रुपयांची रोकड घेऊन निघाले होते. किरण आपटे यांच्या सांगण्यावरून ही रक्कम एका व्यावसायिकाला देण्यासाठी ते सिंहगड रस्त्यावरील ब्रह्मा हॉटेल परिसरात पोहचले. तेथून कारने नऱ्हेकडे जात असताना नवले पुलाच्या मध्यभागी दुचाकीवरून आलेल्या दोघांनी वाहन अडविले. 'आम्ही पोलिस आहोत, तुमच्याकडे काळा पैसा आहे,' असे सांगत त्यांनी रोकड हिसकाविण्याचा प्रयत्न केला. विरोध होताच पवार यांच्या डोळ्यांत मिरची पूड फेकण्यात आली आणि त्यांना जबरदस्तीने वाहनातून शिवापूर पोलिस चौकीकडे नेण्यात आल्याचा आरोप आहे. दरम्यान, पवार यांचे मित्र किरण आपटे हे सुमारे ७३ लाख ५० हजार रुपयांची रोकड घेऊन सुरक्षित ठिकाणी निघून गेले.

सुरुवातीला विक्रम चाकणकर, अमेय, गणेश कदम आणि इतर अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, पुढील तपास आणि इतर आरोपींच्या चौकशीत पोलिस प्रमिला निकम आणि अजीजजब्बार मेस्त्री यांची नावे समोर आली. तपास यंत्रणेनुसार, या दोघांनी मुख्य आरोपींना संरक्षण दिले आणि संपूर्ण कटात त्यांची भूमिका असल्याचे प्राथमिक पुरावे समोर आले आहेत.

अर्जावर सुनावणीदरम्यान आरोपी अधिकाऱ्यांनी, आम्हाला काळा पैसा वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर संबंधितांना आम्ही शिवापूर पोलिस चौकीत आणले.

आम्ही कोणताही गुन्हा केलेला नाही; खोट्या गुन्ह्यात अडकविण्यात आले. निकम ह्या पुरस्कारप्राप्त महिला पोलिस आहेत. मेस्त्री यांचीही सेवाकारकीर्द निष्कलंक आहे. फिर्यादी काळा पैसा घेऊन जात असल्याची माहिती मिळाल्याने त्याला चौकशीसाठी शिवापूर पोलिस ठाण्यात आणले. या घटनेत आम्ही एकही रुपया लुटलेला नाही किंवा दरोडा घातलेला नाही. संपूर्ण रक्कम फिर्यादीकडेच असल्याचा दावा त्यांच्याकडून करण्यात आला.

आम्ही लोकसेवक असून, या प्रकरणामुळे प्रतिष्ठेला धक्का बसला आहे. इतर अधिकाऱ्यांशी असलेल्या वादातून खोटे प्रकरण दाखल केले असून, तपासासाठी आमची कोठडी आवश्यक नसल्याने अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर करावा, असा युक्तिवाद या वेळी करण्यात आला.

# पुण्यात आयटी अभियंत्याचे टोकाचे पाऊल; कौटुंबिक वादातून आत्महत्या

महाईन्यूज । पुणे

**हडपसर येथील अमनोरा गोल्ड टॉवरमध्ये कौटुंबिक वादातून ३३ वर्षीय आयटी अभियंत्याने पंधराव्या मजल्यावरील सदनिकेतून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शनिवारी मध्यरात्री घडली. हडपसर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. राहुल वेदाभ्यास पटेल (वय ३३, मूळ रा. ओडिशा) असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. तो अमनोरा गोल्ड टॉवरमधील पंधराव्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक १५०३ मध्ये भाड्याने राहत होता.**



संबंधित सदनिका मृणाल सोनू कुमार यांच्या मालकीची असल्याची माहिती पोलिसांनी दिली. राहुल हा मूळचा ओडिशा राज्यातील सुगडा परिसरातील रहिवासी होता. तो काही काळापासून पुण्यात राहत असून, शहरातील एका आयटी कंपनीत अभियंता म्हणून नोकरी करत होता. त्याच्या कामानिमित्ताने तो अमनोरा गोल्ड टॉवरमधील सदनिकेत भाड्याने राहत होता. त्याच्या कुटुंबीयांशीही पोलिसांनी संपर्क साधला असून, घटनेची माहिती मिळताच राहुलचे वडील ओडिशाहून पुण्याकडे रवाना झाले आहेत.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल आणि त्याच्या पत्नीमध्ये गेल्या काही दिवसांपासून कौटुंबिक कारणांवरून सातत्याने मतभेद आणि वाद सुरू होते. दोघांमधील तणाव दिवसेंदिवस वाढत गेला होता. परिस्थिती इतकी गंभीर झाली होती की, त्यांचे प्रकरण घटस्फोट घेण्यापर्यंत पोहोचले होते. या कौटुंबिक वादामुळे राहुल मानसिक तणावाखाली असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्याने अमनोरा गोल्ड टॉवरमधील पंधराव्या मजल्यावरील सदनिकेतून खाली उडी मारल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. या घटनेत गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांच्यासह पोलिस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. त्यानंतर राहुलचा मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणी आणि शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. या घटनेमागील नेमके कारण काय होते, तसेच राहुलच्या मानसिक स्थितीबाबत आणि कौटुंबिक परिस्थितीबाबत पोलिसांकडून अधिक माहिती घेतली जात आहे. या प्रकरणी सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास हडपसर पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, मध्यरात्री अचानक सोसायटीच्या परिसरात मोठा आवाज झाल्याने तेथील रहिवासी घाबरून घटनास्थळी धावले. खाली एक तरुण गंभीर अवस्थेत पडल्याचे दिसून आल्यानंतर त्यांनी तत्काळ पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर तरुणाची ओळख पटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. चौकशीत हा तरुण अमनोरा गोल्ड टॉवरमधील पंधराव्या मजल्यावरील सदनिकेत राहत असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित फ्लॅटमध्ये जाऊन पाहणी करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, सदनिकेला डिजिटल लॉक असल्याने पोलिसांना सुरुवातीला घरात प्रवेश करता आला नाही. त्यामुळे पोलिसांनी राहुलच्या पत्नीशी संपर्क साधला आणि सदनिकेच्या डिजिटल लॉकचा क्रमांक मिळविला. संबंधित क्रमांकाच्या मदतीने लॉक उघडल्यानंतर पोलिसांनी फ्लॅटमध्ये प्रवेश करून घराची पाहणी केली. घटनास्थळावरील परिस्थितीची नोंद घेण्यात आली असून, पोलिसांकडून आवश्यक पुरावे आणि माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे.

# पिंपरीतील घटना; पती, पत्नी आणि मुलीचा मृत्यू

## नोकरी गमावली, घर विकले आणि कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या कुटुंबाचे टोकाचे निर्णय

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी परिसरात घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. एका कुटुंबातील तिघांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना रविवारी उघडकीस आली. प्राथमिक तपासात आर्थिक अडचणी, नोकरी गमावल्याने निर्माण झालेला ताण आणि नैराश्य ही या घटनेमागील संभाव्य कारणे असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून, घटनास्थळावरून एक चिठ्ठीही जप्त करण्यात आली आहे. मात्र, सर्व बाजूंनी तपास पूर्ण झाल्यानंतरच मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.**



### नोकरी नाही, घरही विकले

विनोद हे नोव्हेंबर २०२४ पर्यंत एका कंपनीत व्यवस्थापक होते. त्यानंतर नोकरी गेल्याने ते घरीच असायचे. पिल्ले कुटुंबीय हे नेहरूनगरमध्ये राहत होते. मात्र, तीन वर्षांपूर्वी त्यांनी आर्थिक कारणावरून राहते घर विकले. त्यानंतर ते मोरवाडीत भाड्याच्या खोलीत राहत होते. या प्रकरणाचा तपास सुरू असून, पोलिसांकडून सर्व पुरावे, फॉरेन्सिक अहवाल आणि शवविच्छेदन निष्कर्षांच्या आधारे पुढील कारवाई केली जाणार आहे. घटनेमागे इतर कोणते कारण आहे का, याचाही तपास सुरू असल्याने अधिकृत अहवाल येईपर्यंत कोणतेही तर्क लावू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या घटनेमुळे वाढती बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता आणि मानसिक तणाव या गंभीर सामाजिक प्रश्नांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

विनोद पिल्ले (वय ५०), सैलजा (वय ४५) आणि पूर्णिमा (वय १९, सर्व रा. करिष्मा ग्लोरी सोसायटी, मोरवाडी, पिंपरी, मूळ- केरळ) अशी मृतांची नावे आहेत. शुक्रवारी मध्यरात्री विषारी औषध पेटत्या कोळशावर टाकून त्याचा धूर घेतल्याने तिघेही घरात निपचित पडले. तिघांनाही 'वायसीएम' रुग्णालयात दाखल केले.

मात्र, विनोद यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. तर, सैलजा आणि पूर्णिमा यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. आत्महत्येपूर्वी विनोद यांनी 'सुसाइड नोट' लिहिली होती. त्यामध्ये आपण "आर्थिक कारणावरून आत्महत्या करत असून कोणालाही जबाबदार धरू नये," असे त्या नमूद केले. दरम्यान, हे औषध विनोद यांनी ऑनलाइन मागवल्याचे तपासात समोर आले आहे.

मोरवाडीतील एका भाड्याच्या फ्लॅटमध्ये हे कुटुंब वास्तव्यास होते. शेजाऱ्यांना घरातून कोणतीही हालचाल दिसून न आल्याने संशय निर्माण झाला. दरवाजा बराच वेळ बंद असल्याने त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घरात प्रवेश केला असता तिघेही बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

प्राथमिक तपासात संबंधित कुटुंब काही महिन्यांपासून गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत असल्याची माहिती समोर आली आहे. कुटुंबातील प्रमुख व्यक्तीची नोकरी गेल्यानंतर उत्पन्नाचे स्रोत बंद झाले होते. वाढता खर्च, घरभाडे, दैनंदिन गरजा आणि आर्थिक जबाबदाऱ्या यामुळे कुटुंबावर प्रचंड मानसिक ताण निर्माण झाला होता, अशी माहिती तपास यंत्रणांना मिळत आहे.

पोलिसांना घटनास्थळावरून एक हस्तलिखित चिठ्ठी मिळाली असून, त्यामध्ये आर्थिक विवंचना आणि बेरोजगारीमुळे जगणे कठीण झाल्याचा उल्लेख असल्याची प्राथमिक माहिती आहे. या चिठ्ठीची सत्यता, हस्ताक्षर आणि इतर बाबींची फॉरेन्सिक तपासणी करण्यात येणार आहे. त्यामुळे तपास पूर्ण होईपर्यंत कोणताही अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

तपासादरम्यान घरामध्ये कोळसा आणि एका रासायनिक पदार्थाचा वापर करून विषारी धूर तयार करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनास्थळावरील सर्व वस्तू पंचनामा करून जप्त करण्यात आल्या असून, त्यांची वैज्ञानिक तपासणी केली जाणार आहे. शवविच्छेदन अहवाल आणि फॉरेन्सिक निष्कर्ष आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. शेजाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कुटुंब शांत स्वभावाचे होते. त्यांनी कधीही कोणाशी वाद घातला नव्हता. आर्थिक अडचणींची कल्पना काही जवळच्या व्यक्तींना असली तरी इतके टोकाचे पाऊल उचलले जाईल, अशी कुणालाही अपेक्षा नव्हती. दरम्यान, पोलिसांनी कुटुंबातील नातेवाईकांचे जबाब नोंदविण्यास सुरुवात केली आहे. मोबाईल फोन, आर्थिक व्यवहार, बँक खात्यांची माहिती तसेच इतर कागदपत्रांची तपासणी करून कोणताही वेगळा संशयास्पद मुद्दा आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. तपासाच्या प्रत्येक पैलूची पडताळणी करूनच अंतिम निष्कर्ष जाहीर करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

# पिंपरीतील १८ हजार रेल्वे झोपड्यांच्या पुनर्वसनाचा पेच

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील रेल्वेच्या मालकीच्या जागांवरील तब्बल १८ हजार झोपड्यांच्या पुनर्वसनाचा पेच निर्माण झाला आहे. रेल्वेच्या जागांवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी जागा आणि निधी देण्यास रेल्वे प्रशासनाने नकार दिल्याने या झोपड्यांचे पुनर्वसन कसे करायचे? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे याबाबत राज्य शासनानेच स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने केली आहे.**



### आयुक्तांनी बैठक घ्यावी

रेल्वेच्या जागेवरील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी रेल्वे, राज्य शासन, महापालिका आणि एसआरए यांच्यात समन्वय साधून पुनर्वसनाचा मार्ग निश्चित करण्यासाठी विभागीय स्तरावर बैठक घेण्यात यावी.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (एसआरए) स्थापना करण्यात आली आहे. नव्या नियमावलीनुसार आता शासकीय जागांवरील झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचे अधिकार एसआरएकडे आहेत. मात्र, रेल्वेच्या जागा थेट केंद्र शासनाच्या अखत्यारीत येतात.

त्यामुळे या जागांवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करता येत नाही. रेल्वे प्रशासनही जागा आणि निधी दोन्ही देण्यास तयार नाही. एसआरएच्या नोंदीनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील रेल्वेच्या जागांवर ताडीवाला रोड येथे १४ हजार ८३३, घोरपडीमध्ये १ हजार ९५, आनंदनगर (पिंपरी) मध्ये २ हजार ४५४, जुना बाजारमध्ये ४९० आणि पाटकर प्लॉट, शिवाजीनगर येथे ५० अशा एकूण सुमारे १८ हजार झोपड्या आहेत. त्यामुळे या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करून त्यांना हक्काचे घर कसे द्यायचे? असा प्रश्न उभा राहिला आहे.

दरम्यान, रेल्वे, गृहनिर्माण विभाग, जिल्हाधिकारी आणि महापालिका यांच्यात अनेकवेळा पत्रव्यवहार झाला. मात्र, रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदी लागू होत नसल्याचे रेल्वेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्य शासनाने खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत भूमिका घेतल्यास हा प्रश्न सुटू शकतो; अन्यथा रेल्वेच्या जागेवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणे कठीण होणार आहे. अन्यत्र जागा उपलब्ध करून दिल्यास रेल्वेकडून कोणतीही आर्थिक मदत दिली जाणार नसल्याचे पत्राद्वारे कळविले आहे.

# दक्षिण अमेरिकेला जोडणारा समृद्ध दुवा



## भूमिका

**उत्तर आणि दक्षिण अमेरिका खंडाला जोडणारा पनामा कालवा हा भूराजनैतिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. जेवढे महत्त्व होर्मुझच्या सामुद्रधुनीला आहे तेवढेच महत्त्व पनामा कालव्याला सुद्धा आहे. पनामाचे परराष्ट्रमंत्री झेवियर एडवर्ड मार्टिनेज आचा वासकेझ यांनी 19 जुलै ते 24 जुलै 2026 या कालावधीत भारताला 5 दिवस अधिकृत भेट दिली.**



लक्षात घेऊन भारताने इंडोनेशिया आणि म्यानमार बरोबर जशी मैत्री प्रस्थापित केली आहे तशीच मैत्री दक्षिण अमेरिकेतील पनामा गणराज्याशी सुद्धा प्रस्थापित केली आहे. भू राजनैतिक दृष्टीने विचार करता पनामा गणराज्याशी मैत्रीचे संबंध असणे भारताला तीन दृष्टीने लाभदायक ठरू शकते. पहिले म्हणजे भारताचे ब्राझील, अर्जेंटिना या दक्षिण अमेरिकेतील देशांशी असलेले आर्थिक, सांस्कृतिक व भक्कम व्यापारी संबंध हे होय तसेच सध्या भारताने व्हॅनेझुएला या दक्षिण अमेरिकेतील देशाकडून कच्चा तेलाचा पुरवठा सुरू केला आहे तसेच गयाना या देशाबरोबर सुद्धा भारताचे ऊर्जा संबंध प्रस्थापित झाले आहेत. तिसरे म्हणजे दक्षिण अमेरिकेतील गयाना, सुरीना, त्रिनिदाद, टोबॅको या देशातील भारतीयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे आर्थिक संबंधापासून ते सांस्कृतिक आणि व्यापारी संबंधपर्यंत तसेच भविष्यात सामरिक भागीदारीला गती देण्यासाठी सुद्धा पनामासोबत मैत्रीपूर्ण संबंध असणे आवश्यक आहे.भू राजनैतिक महत्त्व

भू राजनैतिक दृष्टीने विचार करता पनामा गणराज्याचे स्वतंत्र महत्त्व आहे. विशेषत: उत्तर आणि दक्षिण अमेरिकेला जोडणारा भू सेतू म्हणून हे गणराज्य ओळखले जाते. उत्तरेला असलेला अटलांटिक महासागर म्हणजे कॅरिबियन समुद्र आणि दक्षिणेला असलेला पॅसिफिक महासागर या दोहोंना जोडणारा प्रवेशद्वार म्हणून त्याला विशेष महत्त्व आहे. या देशाच्या पश्चिमेला कोष्टारीका आणि पूर्वेला कोलंबिया हे दोन छोटे देश वसलेले आहेत. अमेरिका, चीन यांच्यातील स्पर्धा आणि राजकीय दबावामुळे पनामा संघर्षातून वाटचाल करत आहे. जलमार्गाच्या तटस्थतेचे रक्षण करणे हे या देशाचे वेगळेपण होय. भारतासारख्या लोकशाही भागीदाराचा सक्रिय पाठिंबा मिळविण्याचा पनामाचा प्रयत्न आहे. उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका आणि हिंद प्रशांत क्षेत्राला जोडण्यासाठी एक महत्त्वाचा दुवा म्हणून हा देश काम करत आहे. 80 किलोमीटर लांबीच्या कालव्यामुळे या देशाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जागतिक पातळीवर रसद पुरवठा करणे आणि सागरी सुरक्षेसाठी नियंत्रक म्हणून काम करणे ही सुद्धा या देशाची जबाबदारी बनली आहे. भारतासारख्या तटस्थ आणि विकसनशील देशाबरोबर संबंध प्रस्थापित करून सत्ता समतोल साधण्याचा पनामाचा प्रयत्न आहे.

पनामाचे भूराजनैतिक स्थान भारताच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहे कारण आता भारत जगातील चौथ्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून पुढे सरकण्यासाठी गंभीरपणे प्रयत्न करत आहे. या प्रयत्नात पनामाचा सिंहाचा वाटा असणार आहे. भारत-पनामा वाढत्या मैत्रीचे रूपांतर आता भविष्यात आर्थिक भागीदारीमध्ये होणार आहे.

## प्रासंगिक »

### लढाई सत्याची

**एकदा एक कोल्हा भुकेने व्याकुळ होऊन अन्नासाठी भटकत होता. तेवढ्यात त्याला एक मोठ्ठा आवाज ऐकू आला. त्या आवाजाने कोल्हा घाबरला.**

पण तो आवाज कोणता प्राणी काढतोय हे जाणून घेण्याची उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देईना. तो त्या आवाजाच्या दिशेने निघाला. शोधता शोधता त्या आवाजापर्यंत गेला, तेव्हा त्याच्या नजरेला एक नगारा दिसला.

त्यावर एका झाडाची फांदी वाऱ्याने आपटत होती. म्हणून तो आवाज निघत होता. हे पाहून कोल्हा त्या नगाऱ्यावर चढला व त्यावर पाय आपटू लागला. थोड्या वेळाने त्याला वाटले की, हे कातडे जर ओरबाडून काढले, तर आत खूप मांस मिळेल, दोन दिवसांची भूक भागेल.

तो कातडे कुरतडू लागला. त्याच्या दाढा दुखू लागल्या आणि कातडे फाटले, तेव्हा त्याला मांस न दिसल्याने तो दुःखी झाला. त्याला वाईट वाटले.

- तात्पर्य : **जो माणूस मागचा-पुढचा विचार करून वागतो, त्यावर पश्चाताप करण्याची वेळ येत नाही. अविचाराने कोणतीही गोष्ट केली की, वाट्याला दुःखच येते.**

बंगालच्या उपसागरात निर्माण होऊन महाराष्ट्रापर्यंत पोहोचलेल्या यंदाच्या पहिल्या डीप डिप्रेशनचा प्रभाव आता कमी होऊ लागला असला, तरी त्यानंतर राज्यातील पावसाचा केंद्रबिंदू कोकण किनारपट्टी आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्याकडे सरकला आहे.



# डीप डिप्रेशन ओसरले

आधीपासूनच पावसाळ्याच्या दिवसात महापुराच्या संकटांनी चिंतेत असणाऱ्या या भागासमोर यंदाही नवे आव्हान उभे राहिले आहे. गेल्या काही दिवसांपासून डीप डिप्रेशनच्या प्रभावामुळे राज्यभर पावसाचा जोर वाढला होता. आता ही प्रणाली कमकुवत होत असली, तरी मान्सूनचा सक्रिय पट्टा पश्चिम किनारपट्टीकडे सरकल्याने कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाची तीव्रता कायम राहणार आहे. त्यामुळे नद्या, ओढे आणि धबधब्यांमध्ये पाण्याचा प्रवाह वाढण्याची तसेच डोंगराळ भागात दरड कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून काही ठिकाणी अल्प कालावधीत अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. समुद्रही खवळलेला राहण्याची शक्यता असल्याने मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. किनारपट्टीवरील नागरिकांनी भरतीच्या वेळा लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. पश्चिम महाराष्ट्रातही पावसाचा प्रभाव कायम राहणार आहे. सातारा, पुणे, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांच्या घाटमाथा परिसरात जोरदार सरींचा अंदाज असून कोयना, वारणा, राधानगरी, दूधगंगा आणि इतर धरणांच्या पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धरणांच्या पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. खरीप हंगामातील पिकांसाठी हा पाऊस लाभदायक ठरणार असला, तरी नदीकाठच्या गावांनी पूरस्थितीबाबत सतर्क राहण्याची गरज आहे.

विशेषत: आंबा घाट, आंबोली, अणस्कुरा, कुंभार्ली, अम्बेनळी, भोर आणि ताम्हिणी घाट परिसरात मुसळधार पावसामुळे दरड कोसळणे, रस्त्यांवर दगड-माती येणे आणि वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा प्रशासनाने यंत्रणा सज्ज ठेवली आहे. मुंबई महानगर प्रदेशातही अधूनमधून जोरदार पावसाच्या सरी कायम राहण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांत कमी कालावधीत जोरदार पाऊस झाल्यास सखल भागांत पाणी साचणे, रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर परिणाम होणे, तसेच दैनंदिन जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥

ऐसा संताचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सोलापुरात ठाकरे गट आक्रमक

## खासदार संजय राऊतांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करत पालकमंत्री जयकुमार गोरेंवर निशाणा

**महाईन्यूज । सोलापूर**

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत आणि सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यातील राजकीय कलगीतुरा आता चांगलाच पेटला आहे. भाजपने सोमवारी संजय राऊत यांच्या पुतळ्याचे दहन केल्यानंतर, सोलापुरात ठाकरे सेनेने आक्रमक पवित्रा घेतला. संजय राऊत यांच्या समर्थनार्थ आंदोलन करताना ठाकरे गटाचे सोलापूर जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण यांची पालकमंत्री गोरे यांच्यावर टीका करताना जीभ घसरली. दरम्यान, पोलिसांनी या आंदोलकांना ताब्यात घेतले आहे.**



दोन दिवसांपूर्वी संजय राऊत यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर राजकीय टीका केली होती. गेल्या दोन दिवसांपासून त्याचे पडसाद उमटत आहेत. रविवारी (दि.२) भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी संजय राऊत यांच्या पुतळ्याचे दहन करीत आंदोलन केलेल्या चार हुतात्मा पुतळा चौक येथे सोमवारी (दि. ३) शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या स्थानिक पदाधिकार्यांनी खासदार संजय राऊत यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक घातला. तसेच, भाजपने आंदोलन केलेली जागा गोमूत्र शिंपडून स्वच्छ केली. या घडामोडींमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता, ज्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आंदोलकांना ताब्यात घेतले.

याप्रसंगी बोलताना शहर प्रमुख महेश धाराशिवकर म्हणाले, खासदार संजय राऊत हे शिवसैनिकांचे प्रेरणास्थान आहेत. खासदार राऊत यांनी दोन दिवसांपूर्वी केलेल्या वक्तव्याबाबत पालकमंत्री गोरे रविवारी सायंकाळी सोलापूरात येणार असल्याचे समजल्यानंतर भाजपच्या काहींनी त्यांच्या समर्थनार्थ आंदोलनाचे नाटक केले. प्रत्यक्षात, आंदोलनाचा दिखावा करून गोरेंकडून कंत्राट अथवा काहीतरी चिरीमिरी मिळावी, म्हणून तो खटाटोप केला आहे. भाजपचे ते आंदोलनकर्ते पालकमंत्र्याकचे लाभार्थी होते, अशी टिका शहरप्रमुख धाराशिवकर यांनी केली. निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांना खासदार राऊत यांनी पालकमंत्री गोरेंचा समाचार घेतल्याबाबत निश्चित आनंद वाटला असेल, असेही धाराशिवकर यांनी सांगितले.

यावेळी शरणराज केंगनाळकर, संजय पेळ, सुरेश जगताप, दत्ता माने, राजाभाऊ कुसेकर, चंद्रकांत मानवी, योगेश सलगर, उज्वल दीक्षित आदी उपस्थित होते.

राऊत यांनी वापरलेल्या वादग्रस्त भाषेचे समर्थन करताना, ती केवळ संभाषणातील बोलीभाषा होती, अशी सारवासारव स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केली. यावेळी शरणराज केंगनाळकर, संजय पेळ, सुरेश जगताप, दत्ता माने, राजाभाऊ कुसेकर, चंद्रकांत मानवी, योगेश सलगर, उज्वल दीक्षित आदी उपस्थित होते.

### आरक्षित जागा विकण्याचे धंदे बंद करा

या आंदोलनादरम्यान बोलताना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण आक्रमक झाले आणि त्यांची भाषा घसरली. पालकमंत्र्यांवर थेट गंभीर आरोप करताना चव्हाण म्हणाले, "या पालकमंत्र्याना काहीच कळत नाही. सोलापूर शहरातील उमेदवार फोडणे आणि पैशांच्या बळावर दमदाटी करणे हेच त्यांचे उद्योग सुरू आहेत. आरक्षित जागा विकणे आणि हजारो कोटी कमावणे हे धंदे त्यांनी बंद करावेत, अन्यथा सोलापूर शहर बंद करून तीव्र आंदोलन छेडले जाईल. तसेच, "शिवसेनेच्या नादाला लागल्यास याद राखा, शिवसेना अशा दडपशाहीला घाबरत नाही," असा इशारा त्यांनी दिला.

# कोयनेचे पाणी मुंबईला वळविण्याच्या प्रस्तावाने कोकणात चिंतेचे वातावरण!

**महाईन्यूज । मुंबई**

**कोयना जलविद्युत प्रकल्पातून वाशिष्टी नदीत सोडले जाणारे पाणी मुंबईच्या पाणीपुरवठ्यासाठी वळविण्याच्या प्रस्तावाची चर्चा सुरू होताच कोकणात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रस्तावामुळे वाशिष्टी नदीचा बारमाही प्रवाह, नदीतील मत्स्यसंपदा, भूजल पातळी, शेती, पिण्याचा पाणीपुरवठा आणि नदीपात्रातील पर्यावरणीय संतुलन यावर काय परिणाम होणार, याबाबत नागरिक, शेतकरी, मत्स्यव्यवसायिक आणि पर्यावरण अभ्यासकांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.**



कोयना जलविद्युत प्रकल्पातून वीजनिर्मितीनंतर वाशिष्टी नदीपात्रात सोडले जाणारे पाणी गेल्या अनेक दशकांपासून नदीच्या प्रवाहाला आधार देत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे हे पाणी मुंबईकडे वळविल्यास नदीतील बारमाही प्रवाहात घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नदीतील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास नदीच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होऊन संपूर्ण नदी परिसंस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे.

वाशिष्टी नदीवर हजारो नागरिकांचे जीवन अवलंबून आहे. नदीकाठच्या गावांमध्ये पिण्याचे पाणी, शेती, मत्स्यव्यवसाय आणि विविध लघुउद्योगांसाठी या नदीचा वापर केला जातो. नदीतील पाण्याचा प्रवाह कमी झाल्यास स्थानिक जलस्रोतांवर ताण वाढू शकतो. विशेषतः उन्हाळ्यात पाण्याची टंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली आहे. वाशिष्टी नदीला बारमाही पाणी राहते. खेर्डी खडपोली लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीला नदीतून २५ एमएलडी पाणी उचलले जाते. चिपळूण नगरपालिका १० एमएलडी पाणी उचलते त्याशिवाय स्थानिक ग्रामपंचायती सुद्धा वाशिष्टी नदीतून कोयनेचे पाणी उचलतात. उन्हाळ्यात वाशिष्ठ नदी कोरडी पडली होती त्यावेळी पाणीटंचाईला सामोरे जावे लागले होते त्यातून कोयनेच्या पाण्याचे महत्व चिपळूण मधील नागरिकांना समजले होते.

मत्स्यव्यवसाय हा कोकणातील अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा आधार आहे. दाभोल खाडीच्या किनारी असलेल्या ८४ गावांमध्ये मत्स्य व्यवसाय चालतो.

### जलचरांच्या प्रजनन प्रक्रियेवर परिणाम होण्याची भीती

नदीतील पाण्याचे प्रमाण आणि प्रवाह कमी झाल्यास मासे व इतर जलचरांच्या प्रजनन प्रक्रियेवर परिणाम होण्याची भीती मत्स्यव्यवसायिकांनी व्यक्त केली आहे. नदीतील जैवविविधता कमी झाल्यास त्याचा थेट परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होण्याची भीती आहे. नदी ही केवळ वाहणारे पाणी नसून संपूर्ण परिसंस्थेचा कणा असते. नदीतील प्रवाह कमी झाल्यास भूजल पुनर्भरणावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नदीकाठच्या विहिरी, झरे आणि बोअरवेलमधील पाण्याची पातळी घसरण्याची शक्यता आहे. याचा फटका ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांबरोबरच शेतीलाही बसू शकतो.

# पाकिस्तान सरकारचे धाबे दणाणले

## पाकव्याप्त काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यादरम्यान हिंसाचार तीव्र

**महाईन्यूज । स्पेन**

**पाकव्याप्त काश्मीरमधील (POK) विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी रविवारी मतदान पार पडले. नागरिकांचे तीव्र आंदोलन, सुरक्षा दलांची कठोर कारवाई आणि राजकीय चिखलफेकीमुळे ही निवडणूक चांगलीच गाजली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या नेतृत्वाखालील मुस्लीम लीग-नवाज पक्षावर त्यांच्याच मित्रपक्षाने निवडणुकीत गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप केला. सुरक्षेची गंभीर परिस्थिती पाहता सुरुवातीला २७ जुलै रोजी निश्चित करण्यात आलेली ही निवडणूक ऐनवेळी तीन टप्प्यात विभागण्याचा निर्णय तेथील प्रशासनाला घ्यावा लागला.**



काही महिन्यांपूर्वी 'जम्मू काश्मीर जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी' या संघटनेने पाकव्याप्त काश्मीरमध्ये आंदोलनाचे हत्यार उपसले होते. या आंदोलनादरम्यान सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात आतापर्यंत ४० लोकांचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात आहे. यापार्श्वभूमीवर भारताच्या सीमेला लागून असलेल्या या प्रदेशात अचानक हिंसाचाराचा भडका कशामुळे उडाला?

पाकव्याप्त काश्मीरमधील या असंतोषाचे मूळ तिथल्या विधानसभेच्या वादग्रस्त रचनेत दडलेले आहे. या प्रदेशात विधानसभेच्या एकूण ५३ जागा असल्या तरी प्रत्यक्षात मात्र ४५ जागांसाठीच निवडणूक घेतली जाते. उर्वरित आठ पैकी पाच जागा महिलांसाठी आणि तीन जागा अनिवासी काश्मिरी, उलेमा (धार्मिक शास्त्रज्ञ) आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्तींसाठी राखीव ठेवल्या जातात. त्यातच १९४७ मध्ये जम्मू-काश्मीरमधून विस्थापित झालेल्या निर्वासितांसाठी राखीव असलेल्या १२ जागांची तरतूदही वादग्रस्त ठरली आहे. सध्या हे निर्वासित पाकव्याप्त काश्मीरमध्ये राहत नसून देशातील इतर प्रांतात वास्तव्यास आहेत. रविवारी (२ ऑगस्ट) रोजी मतदान घेण्यात आले आणि त्याच दिवशी मुजफ्फराबादमधील नऊ जागांसाठीही मतदान पार पडले.

२०२३ साली पाकव्याप्त काश्मीरमध्ये 'जम्मू काश्मीर जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी' ही संघटना उदयास आली. त्यावेळी या संघटनेने वीजदरवाढ, गव्हाच्या वाढत्या किमती आणि इतर सर्वसामान्यांचे प्रश्न उपस्थित करून पहिल्यांदा जनआंदोलन केले होते. मात्र, कालांतराने या आंदोलनाचे स्वरूप बदलत गेले आणि संघटनेने 'स्वामित्वाचा अधिकार आणि स्वशासन' या व्यापक राजकीय मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले. पुढे या मागण्यांचे रूपांतर ३८ कलमी जाहीरनाम्यात झाले. त्यातील सर्वात महत्त्वाची मागणी पाकव्याप्त काश्मीरच्या विधानसभेतील निर्वासितांसाठी राखीव असलेल्या १२ जागा रद्द करण्याची होती.

### २०१९ नंतर आंदोलनाला मिळाला वेग

लंडनमधील किंग्ज कॉलेजच्या वरिष्ठ संशोधक आणि पाकिस्तानातील राजकीय विश्लेषक आयेशा सिद्दीका यांच्या मते, पाकव्याप्त काश्मीरमधील लोकांनी आपल्या हक्कांसाठी पूर्वीपासूनच आवाज उठवला होता. त्यानंतर जेएएसीची स्थापन झाल्यानंतर या आंदोलनाला संघटित स्वरुप मिळाले. २०१९ मध्ये भारताने जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द केल्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाला. मोदी सरकारच्या या निर्णयाला पाकिस्तानने प्रभावी विरोध न केल्याने पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांमधील अस्वस्थता आणखीनच वाढली.

# मोदींविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या युवतीविरोधात अद्याप गुन्हा नाही

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या १५ वर्षीय युवतीविरोधात अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, असे दिल्ली पोलिसांनी स्पष्ट केले आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या जंतर मंतरवरील आंदोलनात युवतीने मोदींविरोधात आक्षेपार्ह भाषेचा वापर केला होता. याप्रकरणी युवतीवर झिरो एफआयआर दाखल करण्यात आला होता. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी युवतीवर अद्याप नियमित गुन्हा दाखल केला नसल्याचे स्पष्ट केले आहे.**





### माफीच्या व्हिडीओत युवती काय म्हणाली होती?

युवतीने एका व्हिडीओच्या माध्यमातून तिने वापरलेल्या आक्षेपार्ह भाषेबद्दल माफी मागितली होती. "आंदोलनात जमावाच्या प्रभावाखाली येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विरोधात अयोग्य भाषेचा वापर केला. याबाबत लाज वाटत आहे. ही माझी पहिली आणि शेवटची चूक असेल", असे युवतीने म्हटले होते. तसेच, या व्हिडीओत तिने तिचे वय १५ वर्षे असल्याचे सांगितले आहे. या आंदोलनाला पाठिंबाही मिळाला. पण जेन झीच्या भाषेवर टीकाही झाली. खासकरुन पंतप्रधान नरेंद्र मोदींना ज्या पद्धतीने शिवीगाळ केली गेली त्यावर बरीच टीका झाली.

नीट पेपरफुटीविरोधात कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली जंतर मंतरवर आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात सहभागी झालेल्या १५ वर्षीय युवतीने मोदींविरोधात आक्षेपार्ह भाषेचा वापर केला होता. याप्रकरणी नोएडा एक्स्प्रेस पोलिस ठाण्यात युवतीविरोधात झिरो एफआयआर दाखल करण्यात आला होता. यानंतर कारवाईसाठी एफआयआर दल्ली पोलिसांकडे वर्ग करण्यात आला होता. दरम्यान, "मुलगी अल्पवयीन असल्याचा दावा केला जात आहे या पार्श्वभूमीवर नियमित एफआयआर दाखल करण्याबाबतचा निर्णय अद्याप व्हायचा आहे", असे दिल्ली पोलिस सूत्रांच्या हवाल्याने एएनआयने म्हटले आहे.

जंतर मंतरवर आंदोलनात जमावाच्या प्रभावाखाली येऊन आक्षेपार्ह भाषेचा वापर केल्याचे सांगत युवतीने सार्वजनिकरित्या माफी मागितली होती. तसेच, युवतीने तिची ही पहिली आणि शेवटी चूक असेल असेही स्पष्ट केले होते. युवतीविरोधात नोएडा एक्स्प्रेस पोलिस ठाण्यात झिरो एफआयआर दाखल करण्यात आला व पुढील कारवाईसाठी एफआयआर दिल्ली पोलिसांकडे वर्ग करण्यात आला होता. मोदींनी देखील एका व्हिडीओच्या माध्यमातून आंदोलनकर्त्यांना माफ केल्याचे जाहीर केलं होतं.

"नोएडा पोलिसांनी गेल्या आठवड्यात एक झिरो एफआयआर पाठवला होता, परंतु त्याचे दिल्लीत नियमित एफआयआरमध्ये रूपांतर होणे बाकी आहे. त्यामुळे एफआयआर मागे घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही", असे दिल्ली पोलीस सूत्रांच्या हवाल्याने एएनआयने म्हटले आहे. जंतर-मंतर या ठिकाणी झालेलं विद्यार्थी आंदोलन प्रचंड चर्चेत राहिलं. याचं कारण म्हणजे सीजेपीच्या नेतृत्वात झालेलं हे पहिलं आंदोलन होतं आणि या आंदोलनातली मागणी मान्य झाली, ती मागणी होती धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची.



# जान्हवीचा व्हिंटेज लूक

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर पुन्हा एकदा तिच्या फॅशन सेन्समुळे चर्चेत आली आहे. एका जवळच्या मैत्रिणीच्या लग्नाला उपस्थित राहिलेल्या जान्हवीने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये तिचा ग्लॅमरस लूक, बॉयफ्रेंड शिखर पहाडियासोबतची रोमँटिक केमिस्ट्री आणि तिने परिधान केलेला २१ वर्षे जुना व्हिंटेज गाऊन सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. 'धडक' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी जान्हवी कपूर तिच्या स्टायलिश लूकसाठी नेहमीच ओळखली जाते. यावेळीही तिने फॅशनप्रेमींचे लक्ष वेधून घेतले आहे. विशेष म्हणजे, तिने या लग्नासाठी २००५ मधील प्रसिद्ध व्हिंटेज व्हर्साचे आर्काइव्ह कलेक्शनमधील एमराल्ड आणि टील ग्रीन रंगाचा गाऊन परिधान केला होता. या गाऊनमध्ये हॉल्टर नेक डिझाइन, बॉडी-हगिंग फिट आणि हाय-थाय स्लिट अशी आकर्षक रचना होती. त्यासोबत जान्हवीने स्टेटमेंट इअररिंग्ज, हलके वेव्ही हेअरस्टाईल आणि मिनिमल मेकअप करून आपला लूक पूर्ण केला. साध्या पण एलिगंट स्टाइलमुळे तिच्या या लूकचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.



# चित्रपटाने बदललं यामी गौतमचं आयुष्य

अभिनेत्री यामी गौतम आज बॉलिवूडमधील दमदार अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. 'उरी: द सर्जिकल स्ट्राइक', 'आर्टिकल 370', 'ओएमजी 2' यांसारख्या चित्रपटांमधील तिच्या अभिनयाचे मोठे कौतुक झाले आहे. मात्र आज ज्या यामीला यश मिळत आहे, तीच यामी एक काळ असा होता की बॉलिवूड सोडून कायमची हिमाचल प्रदेशात परत जाण्याचा विचार करत होती. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने तिच्या करिअरमधील कठीण काळाबद्दल मनमोकळेपणाने सांगितले.

यामीने 2012 मध्ये 'विकी डोनर' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पहिल्याच चित्रपटामुळे तिची दखल घेतली गेली. मात्र त्यानंतर अपेक्षेप्रमाणे चांगल्या भूमिका तिला मिळाल्या नाहीत. चांगल्या संधीच्या प्रतीक्षेत असताना अनेकदा मनाविरुद्ध काही भूमिका स्वीकाराव्या लागल्या. त्यामुळे ती मानसिकदृष्ट्या खूप निराश झाली होती.

एका मुलाखतीत यामीने सांगितले की, 'उरी: द सर्जिकल स्ट्राइक' आणि 'बाला' हे चित्रपट मिळण्यापूर्वी मी बॉलिवूड कायमचे सोडण्याचा निर्णय घेतला होता. मी हिमाचल प्रदेशात परत जाणार होते. आमच्याकडे शेतीची जमीन आहे. तिथे जाऊन पूर्णपणे वेगळं आयुष्य सुरू करण्याचा माझा विचार होता.

# रकुलचीच सर्वाधिक चर्चा



दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या बहुप्रतिक्षित 'रामायण' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच सोशल मीडियावर त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ट्रेलरमधील भव्य दृश्यं, उत्कृष्ट व्हीएफएक्स आणि दमदार स्टारकास्ट यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. मात्र रणबीर कपूर, यश आणि साई पल्लवी यांच्यासोबतच अभिनेत्री रकुल प्रीत सिंगनेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ट्रेलरमध्ये शूर्पणखेच्या भूमिकेतील तिची छोटीशी झलक पाहून चाहत्यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

'रामायण'च्या ट्रेलरमध्ये रकुल प्रीत सिंग प्रथमच शूर्पणखेच्या भूमिकेत दिसली. तिची स्क्रीनवरची एन्ट्री काही क्षणांची असली, तरी त्या काही क्षणांनीच सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली. अनेक चाहत्यांनी तिचा लूक, आत्मविश्वास आणि स्क्रीन प्रेझेन्सचे भरभरून कौतुक केले आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर एक्स (पूर्वीचे ट्विटर) आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर रकुलच्या भूमिकेबद्दल अनेक सकारात्मक प्रतिक्रिया पाहायला मिळाल्या.

अनेक नेटकऱ्यांनी रकुल प्रीत सिंगला आजवरची सर्वात सुंदर शूर्पणखा असल्याचे म्हटले आहे. काहींनी तिच्या चेहऱ्यावरील भाव, व्यक्तिमत्त्व आणि प्रभावी उपस्थिती या भूमिकेसाठी अगदी योग्य असल्याचे सांगितले. एका चाहत्याने, "शूर्पणखेच्या भूमिकेसाठी रकुलपेक्षा चांगली निवड होऊच शकत नाही," अशी प्रतिक्रिया दिली. तर दुसऱ्या एका युजरने ट्रेलरमधील तिची एन्ट्री ही सर्वात मोठी सरप्राइज असल्याचे म्हटले आहे.

पौराणिक कथांमध्ये शूर्पणखा हे पात्र केवळ रावणाची बहीण म्हणून नव्हे, तर प्रभावी आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेली महिला म्हणूनही दाखवले जाते. त्यामुळे या भूमिकेसाठी रकुलची निवड योग्य ठरल्याचे अनेकांचे मत आहे. तिचा लूक पारंपरिकतेसोबतच प्रभावी वाटत असून, हा लूक प्रेक्षकांच्या लक्षात राहील, असेही अनेकांनी सोशल मीडियावर नमूद केले आहे. काही चाहत्यांनी तर रकुलची कास्टिंग ही चित्रपटातील सर्वोत्तम निवड असल्याचे म्हटले आहे.

'रामायण'च्या ट्रेलरला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटातील भव्य सेट्स, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्कृष्ट व्हिज्युअल इफेक्ट्स आणि कलाकारांची निवड यामुळे हा ट्रेलर विशेष चर्चेत आहे. या चित्रपटात रणबीर कपूर भगवान श्रीराम यांच्या भूमिकेत दिसणार आहे, तर साई पल्लवी माता सीतेची भूमिका साकारणार आहे. अभिनेता यश रावणाच्या भूमिकेत झळकणार असून, त्याच्या लूकचीही मोठी चर्चा सुरू आहे.

याशिवाय सनी देओल, रवि दुबे, काजल अग्रवाल, विवेक ओबेरॉय आणि लारा दत्ता यांसारखे अनेक दिग्गज कलाकारही या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. त्यामुळे 'रामायण' हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात भव्य चित्रपटांपैकी एक ठरणार असल्याची चर्चा सुरू आहे.

ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे. विशेष म्हणजे, मुख्य कलाकारांबरोबरच रकुल प्रीत सिंगच्या शूर्पणखेच्या भूमिकेची सर्वाधिक चर्चा होत आहे. तिचा वेगळा लूक, प्रभावी स्क्रीन प्रेझेन्स आणि दमदार व्यक्तिमत्त्व यामुळे प्रेक्षक आता चित्रपटाच्या प्रदर्शनाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# बुमराहच्या जागी आकिब नबीची टीम इंडियात एन्ट्री!

## श्रीलंका कसोटी मालिकेसाठी बीसीसीआयचा मोठा निर्णय; जम्मू-काश्मीरच्या वेगवान गोलंदाजाला पहिल्यांदाच संधी

**महाईन्यूज । मुंबई :**

**देशांतर्गत क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरीचं फळ अखेरीस जम्मू काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीला मिळालं आहे. आकिब नबीची भारतीय कसोटी संघात निवड करण्यात आली आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिकेत आता आकिब नबी खेळण्याची शक्यता आहे. जसप्रीत बुमराहच्या जागी आकिब नबीची संघात निवड झाल्याची घोषणा बीसीसीआयने केली आहे.**



### श्रीलंकेविरुद्ध भारताचा सुधारित संघ

शुबमन गिल (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), साई सुदर्शन, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, देवदत्त पडिक्कल, सारांश जैन आणि आकिब नबी.

जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबी याची भारतीय संघात निवड झाली आहे. श्रीलंका मालिकेसाठीच्या भारतीय कसोटी संघात तो जसप्रीत बुमराहची जागा घेईल. बुमराहला श्रीलंका दौऱ्यासाठीच्या कसोटी संघातून ऐनवेळी माघार घ्यावी लागली; त्याच्या डाव्या गुडघ्याला झालेली दुखापत कायम असल्याने बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याला विश्रांती घेण्याचा सल्ला दिला होता. बुमराहच्या माघारीनंतर कोणाला संधी मिळणार, याबद्दल सतत चर्चा आणि अंदाज लावले जात होते, परंतु आता निवडकर्त्यांनी आकिब नबीच्या निवडीवर शिक्कामोर्तब केलं आहे.

देशांतर्गत क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरीनंतर वेगवान गोलंदाज आकिब नबीची भारताच्या कसोटी संघात निवड झाली पाहिजे, अशी चर्चा सातत्याने क्रिकेट वर्तुळात सुरू होती. अफगाणिस्तानविरूद्ध कसोटी मालिकेत आकिबचा विचार केला जाईल, अशी चिन्हे होती. पण त्याची निवड करण्यात आली नाही, यानंतर अनेक माजी खेळाडूंनी बीसीसीआयच्या निवड समितीला खडे बोल सुनावले. पण आता श्रीलंकाविरूद्धच्या कसोटी सामन्यापूर्वी जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाल्यानंतर आकिब नबीची बदली खेळाडू म्हणून संघात निवड झाली.

बीसीसीआयने आकिब नबीच्या निवडीबाबत माहिती दिली असून, जम्मू-काश्मीरच्या या गोलंदाजाची भारताच्या कसोटी संघात पहिल्यांदाच निवड करण्यात आल्याचं नमूद केलं आहे. बारामुल्ला एक्सप्रेस नावाने ओळखल्या जाणाऱ्या आकिब नबीने गेल्या दोन रणजी करंडक हंगामांत एकूण १०४ बळी घेतले, ज्यामध्ये २०२५-२६ हंगामातील ६० बळींचा समावेश आहे. जम्मू-काश्मीरच्या पहिल्यावहिल्या रणजी करंडक विजयात त्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच, तो अलीकडेच श्रीलंका दौरा करणाऱ्या 'इंडिया ए' संघाचाही भाग होता, जिथे त्याने दोन प्रथम श्रेणी सामन्यांत ६ बळी घेतले.

# ICCचा मोठा निर्णय! भारतीय वंशाच्या अमेरिकन क्रिकेटपटूवर ८ वर्षांची बंदी

**महाईन्यूज । दुबई**

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (ICC) भ्रष्टाचार-विरोधी लवादाने अमेरिकन क्रिकेटपटू बोडुगुम अखिलेश रेड्डी याला आयसीसीच्या भ्रष्टाचार-विरोधी संहितेतील तीन स्वतंत्र नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दोषी ठरवलं आहे. या गंभीर प्रकरणात, लवादाने रेड्डीवर क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून आठ वर्षांची बंदी घातली आहे.**



### कोण आहे बोडुगुम अखिलेश रेड्डी?

२६ वर्षीय बोडुगुम अखिलेश रेड्डी याने अमेरिकेसाठी चार टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याने 'नॉर्थ अमेरिका टी-२० कप'मध्ये केमन आयलंड्सविरुद्ध अमेरिकेसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्याच्या नावावर एक विकेट जमा आहे. आयसीसीच्या भ्रष्टाचारविरोधी नियमांअंतर्गत देण्यात आलेल्या शिक्षांमध्ये ही आठ वर्षांची बंदी अलीकरून भ्रष्टाचाराबाबत आयसीसीची शून्य-सहिष्णुता भूमिका स्पष्ट होते.

अखिलेश रेड्डीविरोधातील हे संपूर्ण प्रकरण २०२५ मध्ये संयुक्त अरब अमिरातीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या अबू धाबी टी-१० स्पर्धेशी संबंधित आहे. या स्पर्धेदरम्यान भ्रष्टाचारविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला होता. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आयसीसीच्या भ्रष्टाचारविरोधी लवादाने सविस्तर चौकशी केली.

चौकशीअंती रेड्डीने भ्रष्टाचारविरोधी संहितेतील तीन स्वतंत्र नियमांचे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे त्याच्यावर आठ वर्षांची बंदी घालण्यात आली असून, ही बंदी २१ नोव्हेंबर २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. याच दिवशी रेड्डीला सुरुवातीला तात्पुरते निलंबित करण्यात आले होते. त्यामुळे पुढील आठ वर्षे त्याला कोणत्याही प्रकारच्या क्रिकेटमध्ये सहभागी होता येणार नाही.

अबू धाबी टी-१० स्पर्धेसाठी एमिरेट्स क्रिकेट बोर्डाने (ECB) आयसीसीच्या माध्यमातून नियुक्त केलेल्या भ्रष्टाचारविरोधी अधिकाऱ्यांची (DACO) नेमणूक केली होती. स्पर्धेदरम्यान संशयास्पद हालचाली किंवा भ्रष्टाचाराशी संबंधित बाबींची चौकशी करण्याची जबाबदारी या अधिकाऱ्यांवर होती. तपासादरम्यान अखिलेश रेड्डीच्या काही कृती आणि संवाद संशयास्पद आढळून आले. लवादासमोर सादर करण्यात आलेल्या पुराव्यांनुसार, रेड्डीने अबू धाबी टी-१० २०२५ मधील सामन्याच्या निकालावर किंवा सामन्यातील एखाद्या महत्त्वाच्या बाबीवर अयोग्य पद्धतीने प्रभाव टाकण्याचा, म्हणजेच मॅच फिक्सिंगचा प्रयत्न केल्याचे आढळून आले. तसेच, त्याने दुसऱ्या एका खेळाडूला या भ्रष्ट प्रकारात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केल्याचेही तपासात समोर आले.

या प्रकरणाची गंभीरता आणखी वाढली कारण भ्रष्टाचारविरोधी अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू असताना रेड्डीने आपल्या मोबाईल फोनमधील महत्त्वाचा डेटा आणि काही संदेश हटवण्याचा प्रयत्न केला. तपासात अडथळा आणण्याच्या या कृतीचीही लवादाने गंभीर दखल घेतली. आयसीसीच्या भ्रष्टाचारविरोधी लवादाने अखिलेश रेड्डीला तीन स्वतंत्र कलमांखाली दोषी ठरवलं आहे.

यामध्ये कलम २.१.१ अंतर्गत सामन्याच्या निकालावर किंवा सामन्याच्या कोणत्याही पैलूवर अयोग्य प्रभाव टाकण्याचा किंवा निकाल निश्चित करण्याचा प्रयत्न करणे, कलम २.१.४ अंतर्गत दुसऱ्या खेळाडूला अशा भ्रष्ट कृत्यात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणे किंवा मदत करणे आणि कलम २.४.७ अंतर्गत भ्रष्टाचारविरोधी अधिकाऱ्यांच्या अधिकृत तपासात अडथळा निर्माण करण्यासाठी मोबाईलमधील महत्त्वाचा डेटा व संदेश हटवण्याचा प्रयत्न करणे, या आरोपांचा समावेश आहे.

फ्रँचायझी क्रिकेटमध्ये भ्रष्टाचाराच्या घटना वाढत असताना आयसीसीची ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. टी-२० लीगची संख्या जगभरात वाढत असताना सामन्यांमध्ये गैरप्रकार होऊ नयेत यासाठी आयसीसी आणि संबंधित क्रिकेट बोर्डांकडून भ्रष्टाचारविरोधी यंत्रणा अधिक मजबूत केली जात आहे. अखिलेश रेड्डीवर करण्यात आलेली आठ वर्षांची बंदी ही आयसीसीच्या भ्रष्टाचारविरोधी नियमांअंतर्गत करण्यात आलेल्या कठोर कारवाईंपैकी एक मानली जात आहे. या निर्णयातून क्रिकेटमधील भ्रष्टाचार कोणत्याही स्तरावर खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश आयसीसीने दिला आहे.

D Y PATIL
INTERNATIONAL
UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform


OPEN MINDS.
EXPLORE IDEAS.
SHAPE TOMORROW.

BA
LIBERAL
ARTS

THE FREEDOM TO EXPLORE.
THE POWER TO CREATE CHANGE.

A multidisciplinary degree that encourages curiosity, builds perspective and prepares you for a world of possibilities.

- GLOBAL PERSPECTIVE
  Understand the world.
- CRITICAL THINKING
  Question. Analyze. Evolve.
- COMMUNICATION
  Express ideas with impact.
- INTERDISCIPLINARY LEARNING
  Connect concepts. Create solutions.
- DIVERSE CAREER PATHS
  Endless opportunities await.



SCAN QR TO APPLY

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# पवना धरण ९९ टक्के भरले

## पवना धरणातून १०,००० क्युसेकने विसर्ग, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**घाटमाथ्यावर पवना धरण क्षेत्रात कालपासून पावसाने चांगलाच जोर धरला आहे. सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. पवना धरण सध्या ९९ टक्के भरले असून धरणातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी पवना नदीपात्रातील विसर्ग वाढविण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. सध्या नदीपात्रात ५,७२० क्युसेक विसर्ग सुरू असून तो वाढवून आज (दि.०३) रोजी सकाळी दहा वाजता १०,००० क्युसेक इतका करण्यात आला आहे.**



पवना धरण प्रकल्प कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सातत्याने पाऊस सुरू असल्याने धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. पावसाचे प्रमाण आणि येणारा पाण्याचा प्रवाह लक्षात घेता हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवून १५,००० क्युसेकपर्यंत नेण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

सततच्या पर्जन्यामुळे नदी, नाले आणि ओढ्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ होऊ शकते. त्यामुळे पवना नदीच्या सखल भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने नागरिकांना नदीपात्रातील शेती अवजारे, कृषी पंप, जनावरे तसेच इतर साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पवना नदी खोऱ्यातील ग्रामस्थ, शेतकरी आणि नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पूर नियंत्रण कक्ष, पवना धरण प्रकल्प पवनानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'साहित्यरत्न दौड मध्ये' हजारो पिंपरी चिंचवडकर एकत्र धावले..!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यान चौकात अत्यंत दणक्यात, उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात 'साहित्यरत्न दौड २०२६' पार पडली. उल्लेखनीय म्हणजे साहित्यरत्न दौडमध्ये नागरिक, युवक आणि क्रीडाप्रेमींनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला असून २२०० हून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आमदार अमित गोरखे साहेब यांचे विशेष अभिनंदन केले.**






> लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार हे केवळ एका पिढीपुरते मर्यादित नसून ते संपूर्ण बहुजन समाजासाठी आणि युवाशक्तीसाठी सदैव मार्गदर्शक आहेत. आजच्या या 'साहित्यरत्न दौड २०२६' मध्ये पिंपरी-चिंचवडच्या लाडक्या नागरिकांनी आणि युवकांनी ज्या अभूतपूर्व उत्साहात सहभाग घेतला, त्यावरून हे स्पष्ट होते की अण्णा भाऊंचे विचार आजही प्रत्येकाच्या मनात आणि रक्तात रुजलेले आहेत. युवकांना सकारात्मक ऊर्जा, उत्तम आरोग्य आणि सामाजिक समरसतेचा संदेश देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, यापुढेही अशाच प्रेरणादायी उपक्रमांच्या माध्यमातून आपण अण्णाभाऊंचा वैचारिक वारसा पुढे नेत राहू.
>
> **- अमित गोरखे, आमदार.**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे पिंपरी-चिंचवड प्रबोधन पर्व २०२६' या साप्ताहिकांतर्गत हा भव्य उपक्रम राबवण्यात आला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन, आर्टी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि कलारंग यांच्या संयुक्त सहकार्याने या आगळ्यावेगळ्या दौडचे आयोजन करण्यात आले होते. आमदार अमित गोरखे यांच्या कुशल नेतृत्वाखाली पार पडलेल्या या दौडमध्ये अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत... तसेच पिंपरी-चिंचवडसह विविध शहरांतून आलेल्या हजारो नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. नागरिकांच्या अफाट उपस्थितीने बर्ड व्हॅली उद्यान परिसर अक्षरशः दुमदुमून गेला होता.

यावेळी मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आमदार अमित गोरखे साहेब यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच आमदार गोरखे अत्यंत नाविन्यपूर्ण संकल्पनेतून, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्यांदाच 'साहित्यरत्न दौड' चे आयोजन केल्याचे त्यांनी म्हटले. सहसा महापुरुषांच्या जयंतीनिमित्त आपण बोधपर्व किंवा विविध मिरवणुका काढतो. परंतु, शहर सुदृढ राहावे आणि नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे, या उदात्त उद्देशाने आमदार साहेबांनी ही 'साहित्यरत्न दौड – रन फॉर हेल्थ' सुरू केली; ही खरोखरच एक अतिशय स्तुत्य आहे. त्याबद्दल आमदार अमित गोरखे साहेबांचे मी विशेष अभिनंदन करतो. आजच्या या 'रन फॉर हेल्थ' उपक्रमात २,२०० हून अधिक नागरिकांनी अतिशय चांगल्या क्रीडा भावनेने (Spirit) उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे मी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि शासनाच्या विविध उपक्रमांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला आहे. या कार्यक्रमाला सहाय्य केल्याबद्दल पोलीस प्रशासन, महानगरपालिकेचे कर्मचारी आणि सर्व सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. महाराष्ट्रात प्रथमच राबवलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमासाठी सर्वांना खूप खूप शुभेच्छा, या शब्दांत डॉ. सूर्यवंशी यांनी भावना व्यक्त केल्या.

# पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया

## नवी सांगवीतील फेमस चौकातील प्रकार; पाणीटंचाईच्या काळात नागरिकांचा संताप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**एका बाजूला शहराला पाणीपुरवठा करणारे पवना धरण शंभर टक्के भरलेले असून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला नवी सांगवी परिसरातील अनेक भागांमध्ये आजही एका दिवसाआड केवळ दोन तास पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**





नवी सांगवीतील फेमस चौक येथे पाणीपुरवठा विभागाच्या पाइपलाइनच्या कामादरम्यान लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचा आरोप मानवी हक्क संरक्षण आणि जागृती संघटनेचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांनी केला आहे. समतानगर, गणेशनगर, संत तुकारामनगर, समर्थनगर यांसह अनेक उपनगरांमध्ये नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा सहन करावा लागत असताना दुसरीकडे पाण्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

जोगदंड यांनी सांगितले की, फेमस चौक येथे सुरू असलेल्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असल्याची माहिती त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे उपशहर अभियंता (पाणीपुरवठा विभाग) अजय सूर्यवंशी, ह प्रभाग पाणीपुरवठा अधिकारी संभाजी गायकवाड आणि कनिष्ठ अभियंता सोनाली खेमकर यांना दूरध्वनीद्वारे दिली आहे. संबंधित ठिकाणचा व्हिडिओही अधिकाऱ्यांना पाठविण्यात आला असून, तरीही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

"एकीकडे नागरिकांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे, तर दुसरीकडे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. या पाण्याच्या नासाडीला आणि नागरिकांच्या हालअपेष्टांना जबाबदार कोण?" असा सवाल जोगदंड यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, कामाच्या ठिकाणी महापालिका किंवा ठेकेदाराकडून कोणतेही बॅरिकेडिंग अथवा सूचना फलक लावण्यात आलेले नसल्याचेही त्यांनी नमूद केले. यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

याशिवाय, फेमस चौक परिसरात पाणीपुरवठ्याच्या कामामुळे मंगळवारी संध्याकाळी सुमारे अर्धा किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. मात्र, त्या ठिकाणी वाहतूक पोलिस किंवा ठेकेदाराचा कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे वाहतूक व्यवस्थापनाचा अभाव आणि कामाच्या नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पाणीटंचाई, पाण्याची नासाडी आणि वाहतूक कोंडी या तिहेरी समस्यांमुळे नवी सांगवीतील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# मलेशियात 'आरकेएल गॅलेक्सी'च्या विद्यार्थ्यांची सुवर्णमय कामगिरी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मलेशिया येथे पार पडलेल्या मानाच्या आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धा २०२६ मध्ये पुण्यातील ' आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल' (RKL GALAXY INTERNATIONAL SCHOOL) च्या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर भारताचा तिरंगा दिमाखात फडकवला आहे. शाळेचे होतकरू खेळाडू वेदार्थ तापकीर आणि विश्वजीत पवार यांनी उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर पदकांची लयलूट करत पुणे आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.**




> आमच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेली ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यांच्या या यशामुळे भारतीय पारंपरिक युद्धकला 'सिलंबम'चा गौरव जागतिक पातळीवर अधिक उंचावला आहे. शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही यातून नवी प्रेरणा मिळेल.
> **- डॉ . पुष्कर चौबे (चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर - CEO)**

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत वेदार्थ तापकीर याने पोरुथल (काठीची लढत) प्रकारात रौप्य पदक, तर ओपन वेपन प्रकारात कांस्य पदक पटकावले. दुसरीकडे, विश्वजीत पवार यानेही प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज देत पोरुथल प्रकारात रौप्य पदक आणि काठी फिरवणे प्रकारात कांस्य पदक मिळवून देशाच्या पदकसंख्येत मोलाची भर घातली. दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या आत्मविश्वास, शिस्त आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर जागतिक मंचावर छाप पाडली.

या भारतीय संघासोबत सिलंबम स्पोर्ट्स फेडरेशनचे अध्यक्ष व महाराष्ट्रातील एकमेव आंतरराष्ट्रीय सिलंबम एक्सपर्ट संजय बनसोडे आणि आंतरराष्ट्रीय रेफरी स्मिता धीवर यांनी अधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहून खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व क्रीडाप्रेमींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# हॉटेलला लागलेल्या आगीत युवकाचा गुदमरून मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



पिंपरी-चिंचवड शहरातील वाकड फाटा परिसरातील दत्त मंदिर रस्त्यावर असलेल्या दिल्ली 6 बिर्याणी हॉटेलमध्ये भीषण आग लागून १९ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास हॉटेलमधील गॅस सिलेंडर संपल्यानंतर नवीन सिलेंडर जोडण्याचे काम सुरू असताना अचानक आगीचा आणि धुराचा मोठा भडका उडाला. काही क्षणांतच हॉटेलमध्ये धूर पसरल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच वाकड पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, हॉटेलमध्ये अडकलेल्या मोहम्मद सहजद (वय १९) या युवकाचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला.

दरम्यान, सिलेंडर बसवण्यासाठी आलेला गॅस एजन्सीचा कर्मचारी घटनेनंतर घटनास्थळावरून पसार झाला असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणात सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यात आले होते का, तसेच दुर्घटनेस नेमके कोण जबाबदार आहे याचा तपास वाकड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दोषी आढळणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**

Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507